दाखल तारीख : १७/०८/२०२१
नोंदविल्याची तारीख : १७/०८/२०२१
निकालाची तारीख : ०४/०४/२०२६
कालावधी : ४वर्षे, ७महीने, १८ दिवस

**माढा येथील दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात ता.माढा, जि.सोलापूर**

(पिठासीन अधिकारी श्री.पी.जी.लंबे)

**नियमीत दिवाणी दावा क्र. ८०७/२०२१** **निशाणी क्र.३२**

**CNRNOMHSO**170026082021

| | |
|---|---|
| **सर्जेराव सदाशिव दळवी,**<br>वय – ७५ वर्षे, धंदा – शेती,<br>रा. भेंड, ता.माढा, जि.सोलापूर. | **..... वादी** |

**– विरुध्द –**

| | |
|---|---|
| १. **तुषार सर्जेराव दळवी,**<br>वय – २८ वर्षे, धंदा – शेती, | |
| २. **दत्तु गणपत धने,**<br>वय – ६० वर्षे, धंदा – शेती, | |
| ३. **सतीश गणपत धने,**<br>वय – ५५ वर्षे, धंदा – शेती, | |
| ४. **गोरख गोविंद चव्हाण,**<br>वय – ५३ वर्षे, धंदा – शेती, | |
| ५. **किसन गोविंद चव्हाण,**<br>वय – ६२ वर्षे, धंदा – शेती, | |
| ६. **संतोष दत्तू दळवी,**<br>वय – ५० वर्षे, धंदा – शेती, | |
| ७. **विठ्ठल राजाराम दळवी,**<br>वय – ४९ वर्षे, धंदा – शेती, | |

| | |
|---|---|
| ८. **सुनिल सुखदेव कोळी,**<br>वय – ४७ वर्षे, धंदा – शेती, | |
| ९. **शर्मिला सुनिल दळवी,**<br>वय – ४३ वर्षे, धंदा – शेती, | |
| **१०. प्रभाकर भैरु परबत,**<br>वय – ६२ वर्षे, धंदा – शेती, | |
| **११. बाळासाहेब भैरु परबत,**<br>वय – ५५ वर्षे, धंदा – शेती,<br>सर्व प्रतिवादी रा. भेंड, ता.माढा, जि.सोलापूर. | **....प्रतिवादी** |

========================================

**दावा : हद्दीखुणा कायम होवून मिळण्याकरीता**

========================================

========================================

वादीतर्फे अधिवक्ता : श्री.जी.सी.काळे,
प्रतिवादी क्र. १ ते ११ यांचेविरुध्द दावा एकतर्फा.

========================================

# न्यायनिर्णय

(अधिघोषीत दिनांक ०४ एप्रिल, २०२६)

वादीने प्रस्तुतचा दावा हद्दीखुणा कायम होवून मिळण्याकरीता दाखल केला आहे.

०२. **मिळकतीचे वर्णन** – मौजे भेंड, ता.माढा, जि.सोलापूर येथील गट क्र. २१४ क्षेत्र ४हे. ४५आर त्यापैकी प्रस्तुतचे दाव्याचा विषय असलेली वादी यांची

असलेली मिळकत पुढीलप्रमाणे–

| गट क्रमांक | क्षेत्र | चतुःसिमा |
|---|---|---|
| २१४/१ | ०२हे. १०आर अधिक पोट खराब ०.हे ०२आर | पुर्वेस–जमीन गट क्र. २१४/२, पश्चिमेस– जमीन गट क्र. २१५, दक्षिणेस– अरणची शिव व उत्तरेस– जमीन गट क्र. १७८ |

यानंतर "**दावा मिळकत**"  असे संबोधले आहे.

**<u>दाव्यातील वस्तुस्थिती थोडक्यात खालीलप्रमाणे</u> :–**

०३. वर नमूद मिळकत ही यातील वादी व प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचे मालकी हक्काची प्रत्यक्ष कब्जेवहीवाटीची आहे. प्रतिवादी क्र. ५ ते १२ हे वादीचे बांधालगतचे शेतकरी आहे. प्रतिवादी यांची मिळकत वादी यांचे मिळकतीच्या पोट–हिस्यालगत असून वादी व प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचा मुळ गट क्र. २१४ हा एकच असल्याने सदर प्रतिवादी यांना या दाव्याचे कामी सामील केले आहे. प्रतिवादी यांनी दावा मिळकतीच्या हददीखुणा व चारही बाजूकडील बांध व ताली नांगरुण मोडून टाकले आहे. त्यावेळी, वादी यांना त्यांची मिळकत तीचे मशागत करताना दावा मिळकतीचे क्षेत्र, हद्दी व चतुःसिमा पुर्वीप्रमाणे नाहीत असे दिसून आले. त्यावेळी, वादी यांना दावा जमीनीची मोजणी करीत असताना अंदाजे २०आर क्षेत्र कमी पडत असल्याचे लक्षात आले. त्यावेळी, प्रतिवादी यांना विचारणा केली असता त्यांनी दावा मिळकतीच्या हद्दीखुणा व चतुःसिमा चुकीचे आहेत असे म्हणून वाद निर्माण केला. प्रतिवादी यांनी दावा जमीनीच्या हद्दी व चतुःसिमा वादी यांना निश्चीतपणे मोजून दिल्या नाहीत. भुमी अभिलेख, माढा यांच्याकडे गट क्र. २१४ चे गट क्र. २१४/१ व २१४/२ असे पोट हिश्याची

आजतागायत मोजणी होवून विभाजन केलेले नसल्यामुळे त्याचे नकाशामध्ये विभाजन झालेले नाही. सदर मिळकतीचे केवळ ७/१२ उतारे वेगळे झालेले आहेत. वादी यांनी प्रतिवादी यांच्याकडे दि.२५/०२/२०२१ रोजी हद्दीखुणा कायम करण्याकरीता एकत्रीत मोजणी करण्याकरीता विचारणा केली असता प्रतिवादी यांनी संमती दिली नाही. त्यामुळे, वादी यांनी सदर मोजणी होवून हद्दीखुणा कायम होण्याकरीता प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे.

०४. प्रतिवादी क्र. १ ते ६ व ८ ते ११ यांना दाव्याची समन्सची बजावणी होवूनही ते हजर न राहील्याने सदरचा दावा दि.०२/०३/२०२३ रोजीच्या आदेशाने त्यांच्याविरुध्द एकतर्फा चालविण्यात आला.

०५. प्रतिवादी क्र. ७ यांना दाव्याची समन्सची बजावणी होवूनही ते हजर न राहील्याने सदरचा दावा दि.१५/०३/२०२३ रोजीच्या आदेशाने त्यांच्याविरुध्द एकतर्फा चालविण्यात आला.

०६. वादीतर्फे विधीज्ञांचा यूक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले. खालील प्रश्न माझ्या विचारार्थ उपस्थित होत असून मी त्यांचे कारणमिमांसेसह निष्कर्ष खालीलप्रमाणे देत आहे.

| <u>अ.क्र.</u> | <u>प्रश्न</u> | <u>निष्कर्ष</u> |
|---|---|---|
| १. | वादी मागणीप्रमाणे गट क्र. २१४/१ व २१४/२ या क्षेत्राच्या हद्दीखुणा निश्चित करुन फाळणी नकाशा व गट विभाजनाचे आदेश मिळण्यास पात्र आहे काय? | **<u>होकारार्थी</u>** |

| | | |
|---|---|---|
| २. | आदेश व हुकुमनामा काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## कारणमिमांसा

०७. दाव्यातील कथनांच्या पुष्ठ्यर्थ वादीने स्वतःचे पुराव्याचे शपथपत्र नि.क्र.१५ कडे दाखल केले असून त्यांचेतर्फे साक्षीदार म्हणून साक्षीदार क्र. २– नानासाहेब सोपान घुमरे (भुकरमापक) यांना निशाणी २९ खाली तपासले आहे. वादीने नि.क्र. ३१ कडे पुरशीस दाखल करून त्याचा पुरावा बंद केला आहे.

०८. वादीने त्याच्या कथनाचे पुष्ठ्यर्थ खालील कागदपत्रे दाखल केली आहेत.

| अ.क्र. | दस्तऐवज | नि. क्र. |
|---|---|---|
| १ | कोर्ट कमिशनर अहवाल | १३ |
| २ | मोजणी नकाशा | ३० |
| ३ | गट क्र.२१४/१ चा ७/१२ उतारा | १६ |
| ४ | गट क्र.२१४/२ चा ७/१२ उतारा | १७ |
| ५ | गट क्र.२१५/२ चा ७/१२ उतारा | १८ |
| ६ | गट क्र.२१५/३ चा ७/१२ उतारा | १९ |
| ७ | गट क्र.१९९/१ चा ७/१२ उतारा | २० |
| ८ | गट क्र.२००/२ चा ७/१२ उतारा | २१ |
| ९ | गट क्र.२१३ चा ७/१२ उतारा | २२ |
| १० | गट क्र.१७८ चा ७/१२ उतारा | २३ |

| | | |
|---|---|---|
| ११ | गट क्र.२१५/१/अ चा ७/१२ उतारा | २४ |
| १२ | गट क्र.२१५/१/ब चा ७/१२ उतारा | २५ |
| १३ | गट क्र.२१४ चा नकाशा | २६ |

<u>**प्रश्न क्र. १ करिता**</u> **:–**

०९. प्रस्तुत प्रकरणी वादीने स्वतःस शपथेवर तपासले असून त्याचा उलटतपास न झाल्याने त्याचे शपथेवरील कथन विना आव्हानीत राहीले आहे. वादीने दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता वादी सर्जेराव सदाशिव दळवी हे गट क्र. २१४/१ ज्याचे क्षेत्र २हे. १०आर असून त्यापैकी १हे. ३०आर चे धारक असल्याचे दिसून येते. प्रतिवादी क्र. १ तुषार सर्जेराव दळवी हे ८०आर क्षेत्राचे धारक असल्याचे दिसून येते. गट क्र. २१४/२ याचे दत्तू गणपण धने १हे. १४आर क्षेत्राचे सतिश गणपत धने १हे. १४आर क्षेत्राचे धारक असल्याचे दिसून येते. सदर प्रकरणी निशाणी ९ चे आदेशानुसार कोर्ट कमिशनर यांची नेमणूक होवून कोर्ट कमिशनर यांचेमार्फत मोजणी झाल्याचे दिसते. सदरचा अहवाल निशाणी १३ कडे दाखल आहे. या प्रकरणी वादीतर्फे साक्षीदार क्र.२–नानासाहेब घुमरे (भुकरमापक) यांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता त्यांनी गट क्र. २१४, २१४/१ व २१४/२ या गटांची वादी व प्रतिवादीच्या सांगण्यानुसार व वहीवाटीनुसार त्यांनी वहीवाटीच्या खुणा दाखवून रोवर मशीनच्या साहयाने मोजणी केली आहे. त्यांनी वादी, प्रतिवादी क्र. २, ५, ६, ८ व प्रतिवादी क्र. ७ यांचा मुलगा याच्या त्यावेळी पंचनाम्यावर सहया घेतल्या असल्याचे सांगीतले आहे. त्याप्रमाणे, त्यांनी निशाणी ३० कडील मोजणी नकाशा तयार केल्याचे कथन केले आहे. त्यांनी मोजणी नकाशामध्ये वादी व प्रतिवादी यांच्या हद्दी दर्शविलेल्या

आहेत. सदर निशाणी ३० कडील नकाशाचे व मोजणीदाराच्या पुराव्याचे अवलोकन केले असता लाल रंगाच्या तुटक रेषेच्या आधारे त्यांनी वादी व प्रतिवादीच्या हिश्याची हद्द दाखविली आहे. वादी व प्रतिवादी यांच्या प्रत्यक्ष वहीवाटीची हद्द काळया रंगाच्या तुटक रेषेने दाखविली आहे. सदर मोजणीदार यांचे साक्षीचे अवलोकन केले असता त्यांनी लगतच्या गट धारकांना नोटीसा दिल्याचे तसेच गट क्र. २१४ चे म्हणजेच गट क्र. २१४/१ व २१४/२ याचे हिस्सेदारांना देखील नोटीस दिल्याचे दिसून येते. सदर प्रकरणी प्रतिवादी यांनी सदर साक्षीदाराचा उलटतपास घेतलेला नाही किंवा सदर प्रकरणी हजर राहून वादीचे दाव्यास विरोध केलेला नाही. या परिस्थितीत, मोजणीदार यांचे साक्षीवर गैरविश्वास ठेवण्याकरीता कोणतीही परिस्थिती दिसून येत नाही. त्यामुळे, निशाणी ३० कडील नकाशानुसार पोट–हिस्से व त्याचे स्थान हे लाल रंगाच्या तुटक रेषेने असलयाचे वादी यांनी सदर कोर्ट कमिशनरच्या साक्षीतून सिध्द केले आहे. वादी यांनी सदर लाल रंगाच्या तुटक रेषेने दाखविलेल्या हद्दीखुणेबाबत कोणताही वाद उपस्थित केलेला नाही. या परिस्थितीत, वादी यांच्या मागणीप्रमाणे हद्दीखुणा निश्चितीची दाद मंजूर होण्यास पात्र आहे.

१०. वरील चर्चेनुसार मोजणीदार यांनी निश्चित केलेल्या हद्दीनुसार वादी व प्रतिवादी यांचे गट क्र. २१४/१ व २१४/२ असे क्षेत्र मोजणी नकाशाप्रमाणे असल्याचे सिध्द झाले आहे. वादीने दाव्यामध्ये गट क्र. २१४/२ चे वर्णन केलेले नसले तरी गट क्र. २१४ व २१४/१ चे वर्णनाप्रमाणे हद्दीखुणा निश्चित केल्याने गट क्र. २१४/२ चे क्षेत्र नकाशावर स्पष्ट होत आहे. गट क्र. २१४/२ चे धारकांचे उपस्थितीमध्ये सदर मोजणी झाली आहे. या परिस्थितीत, मोजणीदार यांनी दर्शविलेल्या हद्दीखुणानुसार

पोट–हिस्से बाबत फाळणी नकाशा होवून मिळण्याची दाद आवश्यक त्या शाासकीय फीची आकारणी करुन मंजूर होणेस पात्र आहे. सबब, प्रश्न क्र. १ चे उत्तर मी होकारार्थी देतो.

**प्रश्न क्र. २ करिता** :–

११. प्रश्न क्र. १ च्या उत्तरानुसार वादीचा दावा मंजूर होण्यास पात्र आहे. करीता, प्रश्न क्र. २ चे उत्तराकरिता मी खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | वादीचा दावा मंजूर करण्यात येत आहे. |
| २. | वादी, प्रतिवादी क्र. १, प्रतिवादी क्र. २ व प्रतिवादी क्र. ३ यांचे गट क्र. २१४/१ व २१४/२ चा निशाणी ३० कडील मोजणी नकाशा नुसार स्वतंत्र फाळणी नकाशा व हद्दीखुणा कायम करणेबाबतची प्रक्रिया नियमानुसार पुर्ण करण्याकरीता सदरचे प्रकरण जिल्हा भुमी अभिलेख, सोलापूर यांना पुढील कारवाईसाठी पाठविण्यात यावे. |
| ३. | निशाणी ३० कडील मोजणी नकाशा हुकूमनाम्याचा भाग समजण्यात यावा. |
| ४. | येणेप्रमाणे हुकूमनामा तयार करण्यात यावा. |

LAMBE PRATIK GANESH
Digitally signed by LAMBE PRATIK GANESH
Date: 2026.04.04 16:57:28 +0530

**( प्रतिक गणेश लंबे )**

दिनांक : ०४/०४/२०२६. सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, माढा.